"सर्वांसाठी घरे -२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या खाजगी जमीनीवरील अतिक्रमण धारकांना पट्टेवाटप करण्यासंदर्भात कार्यप्रणाली निश्चित करणे....

# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- नामपा-२०१९/प्र.क्र.३४/नवि-२६

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १) शा.नि. नगरविकास विभाग, क्रमांक- एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८ दिनांक १७/११/२०१८

२) शा.नि.नगरविकास विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १५ /नवि-२६ दिनांक ०६/०३/२०१९

**प्रस्तावना :-**

"सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या अतिक्रमित जमिनींच्या तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या महसूल विभागाच्या अखत्यारितील जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन अतिक्रमणधारकांना पट्टे वाटप करण्याबाबत शासनाने दि.१७.११.२०१८ रोजीच्या आदेशान्वये पट्टेवाटपाच्या संदर्भात मार्गदर्शक सूचना निश्चीत केल्या असून, त्यानुसार कार्यवाही सुरु झालेली आहे. तद्नंतर दि.०६.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये ह्या मार्गदर्शक सूचना नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या इतर शासकीय विभागांच्या (वन जमिनी वगळून) जमीनीवरील अतिक्रमीत झोपडपट्टीधारकांना पट्टेवाटपासाठी लागू करण्यात आले आहेत.

परंतु नागरी क्षेत्रातील खाजगी जमीनीवर वर्षानुवर्षे अतिक्रमण करुन रहात असलेल्या अतिक्रमणधारकांना, त्यांची अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टा देण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने व अशा जमीनी त्यांच्या स्वत:च्या नावे नसल्याने, याबाबतची कार्यवाही सद्य:स्थितीत प्रलंबित राहिलेली आहे. परिणामी, "सर्वांसाठी घरे-२०२२" या केंद्र शासनाच्या महत्वकांक्षी योजनेचा लाभ अशा जमीनीवरील अतिक्रमणधारकांना घेता येत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

तद्नुषंगाने, राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेरातील खाजगी जागेवरील अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण क्षेत्र घोषीत झोपडपट्टी म्हणून संबोधले गेले असल्यास, अशा खाजगी जागेवरील अतिक्रमणधारी झोपडपट्टीवासियांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत भाडेपट्टा देण्याच्या संदर्भात, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातंर्गत असलेल्या नागरी स्थानिक संस्थांच्या हद्दीतील खाजगी जमिनी वगळून इतर नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील खाजगी जमिनीवरील अतिक्रमीत झोपडपट्टीधारकांना पट्टेवाटप करण्याच्या अनुषंगाने कार्यप्रणाली निश्चीत करण्यासंदर्भात मा. मंत्रिमंडळाने दिनांक २०/०८/२०१९ च्या बैठकीत निर्णय घेतला आहे. त्यानुसार अशा कार्यप्रणाली संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रस्तावनेतील पार्श्वभूमी व त्याअनुषंगाने मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चीत करण्यात येत आहे.:-

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा अंतर्गत असलेल्या नागरी स्थानिक संस्थांच्या हद्दीतील खाजगी जमिनी वगळून इतर नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या अतिक्रमित खाजगी जमिनींवर संबंधित नागरी स्थानिक संस्थेने महासभेच्या मंजूर ठरावाद्वारे, प्रथमत: "बेघरांसाठी घरे" (Housing for dis-housed) अथवा "जनतेसाठी घरे" (Public Housing) असे सुयोग्य आरक्षण निश्चित करावे.

आ) त्याचवेळी, मंजूर ठरावाच्या आधारे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार आरक्षण बदल / निश्चीतीची कार्यवाही सुरु करावी.

इ) अशी कार्यवाही सुरु अराताना, मंजूर ठरावाच्या आधारे, संबंधित नागरी स्थानिक संस्थेने चटईक्षेत्र निर्देशांक धोरणानुसार (टीडीआर पॉलीसी) अशा जमिनी वरील "अ" येथील प्रयोजनार्थ अशी जमीन संपादीत करण्यासाठी कार्यवाही सुरु करावी.

ई) यानुसार, संदर्भाधीन शासन निर्णय क्र.एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दि.१७.११.२०१८ मधील तरतूदीची पुर्तता होत असल्यास शासन मान्यतेने पट्टेवाटपाची कार्यवाही करावी.

**अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करीत असताना, अशी खाजगी जमीन ज्या धारणाप्रकारातील असेल, त्या धारणप्रकारानुसार असलेले जमीनविषयक सर्व कायदे/नियम/शासन निर्णय यामधील तरतुदींची अंमलबजावणी होईल याबाबतची संपूर्ण खात्री करण्यात यावी.

२. अशा जमीनीसंदर्भात, न्यायालयीन प्रकरणे दाखल असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती विचारात घ्यावी. तसेच अशा जमीनीसंदर्भात, मा.न्यायालयाने कांही आदेश दिले असल्यास, अशा आदेशांचा भंग होणार नाही, याची जबाबदारी संबंधीत नागरी स्थानिक संस्थांचे संबंधीत आयुक्त/मुख्याधिकारी यांची राहील.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संकेताक २०१९०९१११५००१८०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.09.11 15:12:45 +05'30'

**( सं.श.गोखले )**

**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य,



Scanned by CamScanner

२) मा.मुख्य सचिव
३) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग/गृहनिर्माण विभाग/महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, (नवि-१/नवि-२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) सर्व जिल्हाधिकारी
९) सर्व महानगरपालिका आयुक्त (मुंबई महानगरपालिका प्रदेश विकास प्राधिकरणातंर्गत असलेल्या महापालिका वगळून)
१०) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
११) सर्व नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी,
१२) सर्व जिल्हा अधिक्षक भूमीअभिलेख
१३) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवडनस्ती, कार्यासन नवि-२६.



Scanned by CamScanner